## GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD.

**इयत्ता – ९ वी अ,ब,क.** **FINAL EXAMINATION** **मार्क – ८०**

**दिनांक : १३ मार्च २०२६** **विषय : मराठी** **वेळ – २/1/2 तास**

**INSTRUCTIONS – 1. This paper comprises of two sections. Section A & B.**
**2. Section 'A' answers must be written on the answer Sheet.**
**3. Section 'B' answers must be written on worksheet Itself.**

---

**विभाग " अ "** **गुण ४०**

**प्रश्न १. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:**

व्हेनिस हे त्या गाडीचे अखेरचे स्टेशन होते. त्यामुळे रेल्वेचे दोन नोकर 'ऑल आउट' असे इंग्रजीतून आणि त्याच अर्थी इटालियन व फ्रेंचमधून ओरडत डब्या- डब्यांतून फिरत होते. त्या अमेरिकन म्हाताऱ्याजवळ चिकार सामान होते. व्हेनिसला बिऱ्हाड बदलायच्या इराद्याने आल्यासारखे, त्यामुळे त्यांनी दोन पोर्टर्स बोलावले. मी त्या स्त्रियांचे औपचारिक आभार मानून माझी छोटी बॅग घेऊन निघालो. स्टेशनच्या बाहेर येऊन पाहतो तर रस्ता नव्हताच ! होता तो एक प्रचंड कालवा, विस्तीर्ण नदीसारखा. हाच तो ग्रँड कॅनॉल, त्यात अनेक पॉटर टॅक्सी म्हणजे लहान मोटर लाँचीस आणि मोठ्या यांत्रिक नावा उभ्या होत्या. 'व्हेनिझिया व्हेनिझिया, पियाझा-पियाझा ' असा त्यांचा पुकार चालला होता. टॅक्सीपेक्षा बस स्वस्त पडणार हे सांगायला काही अर्थतज्ञ लागत नाही. मी अडीचशे लिरांचे बोटीचे तिकीट काढले. दोनएकशे प्रवासी पोटात घेऊन आमची नाव जोरात निघाली.

ते वातावरण अतिशय प्रसन्न होते. विशाल कालव्यावर अनेक उत्साही प्रवासी वेगाने जा – ये करत होते. हायवेवर वाहनांची वाहतूक चालावी तशी त्या जलमार्गावर नावांची धावपळ चालली होती. अनेक प्रकारच्या नावा कालव्यातून चालल्या होत्या. हवेत गारवा होता, वाऱ्यात उत्साह होता, मनात संगीत होते आणि सभोवार पसरलेल्या पाण्यात तारुण्य होते. रोमला भेटलेला एक इटालियन लेखक मला म्हणाला होता ते खरेच होते. 'व्हेनिस हे जगातलं एकच असे शहर आहे, की त्याचं वर्णन करता येत नाही. तिथं प्रत्यक्षात गेलं पाहिजे. तिथली हवा खाल्ली पाहिजे. तिथं राहिलं पाहिजे. तरच तुम्हांला व्हेनिस म्हणजे काय ते समजेल.'

कारण हे पाण्यातले असे जगातले एकमेव अद्भुत शहर आहे. ज्या शहरात एकाही मोटार नाही. वाहतूक नियंत्रण करणारा पोलीस नाही. ट्रॅफिक लाईट्स नाहीत आणि रस्त्यावर धक्काबुक्की नाही असे हे जगातले एकमेव शहर, कारण याला खऱ्या अर्थाने रस्तेच नाहीत. आहेत ते कालवे-फक्त कालवे आणि त्यांना जोडणारे पूल. आईच्या गळ्यात मुलाने हात टाकावा तसे हे पूल. लाडिक, प्रेमळ. हा गाव म्हणजे रूढ अर्थाने शहर नव्हेच, तर अनेक छोटया बेटांचा हा पुंजकाय आहे. निळ्या मखमली सागरावर टाकलेल्या हिऱ्यामाणकांच्या ढिगासारखा हा लांबून दिसतो. मधूनच चर्च किंवा जुना राजवाडा यांची टोके आभाळात घुसतात खुर्च्या टाकलेल्या. ग्रँड कॅनॉलच्या किनाऱ्यावर चार खुर्च्यांच्या मध्ये टेबल आणि त्यावर रंगीबेरंगी प्रचंड छत्री. या खुर्च्यांवर बसून कॉफी घेत समोरून सरकणाऱ्या विविध आकारांच्या आणि अनंत प्रकारांचे उतारू वाहून नेणाऱ्या नावांची ये जा पाहत बसायचे. तीच गंमत या नावांतून प्रवास करणाऱ्यांनाही पाहायला मिळते. डेकवर येऊन किनाऱ्यावरच्या निरुद्यो. ग्रँड कॅनॉलच्या किनाऱ्यावर

गी संथ, शांत, चित्रविचित्र प्रवाशांच्याकडे पाहत पुढेपुढे सरकायचे. हे शहर निरुद्योगीसाठीच आहे यात शंका नाही, कारण इथे येणाऱ्या प्रवाशांना कसलीही घाई गर्दी नसते. न्यूयॉर्क, मुंबई, हाँगकाँग अशा शहरांतल्या धावपळीपासून हे निवांत शहर सर्वस्वी अलिप्त आहे.

व्हेनिसचे रस्ते म्हणजे पाणस्ते असतात याची कल्पना नसलेला एक मुनीम एकदा लडनहून व्हेनिसला विमानाने आला. रस्त्यावर सगळीकडे पाणीच पाणी झालेले पाहून त्याने आपल्या मालकाला तार केली, "व्हेनिसमध्ये पूर आला आहे. सगळे रस्ते पाण्यानं तुडुंब आहेत. परत येऊ की पूर ओसरेपर्यंत वाट पाहू ते कळवा!"

व्हेनिस म्हणजे अफाट जलदर्शन! व्हेनिस म्हणजे केवळ कालव्यांचेच नव्हे तर कालव्यातही तरंगणारे शहर ! एक प्रचंड उत्साह आणि उत्सव ! दोन दिवसांच्या निवांत मुक्कामानंतर हे गोड, कलासक्त आणि निळ्या पाण्यावर तरंगणारे शहर सोडताना मनाला खूपच हुरहुर बाटली.

**कृती १.खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** **गुण ५**

१. टॅक्सीपेक्षा काय स्वस्त पडणार असे लेखकला वाटते?

२. व्हेनिस म्हणजे केवळ कालव्यांचेच नव्हे तर कशा प्रकारचे शहर आहे असे लेखक म्हणतात ?

३. व्हेनिसचे रस्ते कसे आहेत ?

४. व्हेनिस या शहरात असलेल्या कालव्याचे नाव काय आहे?

५. ग्रँड कॅनॉल कसा आहे?

**कृती २. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा:** **गुण १**

१. न्यूयॉर्क, मुंबई, हाँगकाँग अशा शहरांतल्या ------------------------------ हे निवांत शहर सर्वस्वी अलिप्त आहे.

२. एक प्रचंड ------------------------------ आणि उत्सव !

**कृती ३ . खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **गुण ६**

१. लंडनहून आलेल्या एका मुनीमाने आपल्या मालकाला तार करून काय सांगितले?

२. ग्रँड कॅनॉलच्या किनाऱ्यावरचे थोडक्यात वर्णन करा?

३. लेखक स्टेशनबाहेर आल्यावर लेखकाला कोणते दृश्य दिसले?

**प्रश्न २. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा: ( कोणतेही ६ ) Any 6** **गुण ६**

१. व्यायामाचे महत्व या कवितेचे कवि कोण आहेत ?

२. हेलन केलर यांनी शिकलेला पहिला इंग्रजी शब्द कोणता ?

३. भारतात रेल्वे असावी म्हणून कोणी उठाव केला होता?

४. हेलन केलर यांना शिकवणाऱ्या बाईचे नाव काय होते ?

दिवशी सुरू होणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनानिमित्व 'वसंतोत्सव' असेही संबोधले जाते. यालाच धुळवड किंवा धुलीवंदन असेही म्हटले जाते. काही ठिकाणी पंचमीला म्हणजेच होळीनंतर पाचव्या दिवशी रंगपंचमी साजरी केली जाते.

होळी या सणाला थंडीचे दिवस म्हणजे हिवाळा हा ऋतू संपलेला असतो. थंडीने त्रासलेले प्राणी, झाडे, फुले ही जोमात, उत्साहात आलेली असतात. झाडाची पाने गळून नवीन पानांनी झाडे बहरलेली असतात झाडांची मळलेली पाने, पालापाचोळा, काड्या जमा करून त्यांची होळी करण्याची आपली परंपरा आहे.

भारतात शेतकरी वर्गात होळीचे खास महत्व आहे. यादिवशी हाती आलेल्या पिकांबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना करतात नवीन पीक अग्नीला समर्पित करण्याची व गव्हाचे पीक हाती आल्यामुळे होळीच्या दुसऱ्या दिवशी गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे.

गावामध्ये नृत्याचे सादरीकरण हा शिमगा उत्सवातील अविभाज्य भाग असतो. वेगवेगळी सोंगे धारण करून कलाकार मंडळी लोकांचे मनोरंजन करतात काटखेळ, डेरानृत्य, गौरीचा नाच, चवळी नृत्य, जाखडी नृत्य तसेच स्त्री वेष धारण करून काही पुरुषमंडळी तमाशा सादर करतात. ढोल-ताशाचे युवा पथके लोकांचे लक्ष वेधून घेतात. पारंपरिक वेशभूषा करून गीत आणि वादयवृंदाच्या साथीने लोकनृत्य सादर केले जाते. होळी या उत्सवाचे पौराणिक महत्व आहे. भक्त प्रल्हादाला मारण्यासाठी राजा हिरण्यकश्यपूच्या सांगण्यावरून हिरण्यकश्यपूची बहीण होलिका प्रल्हादाला मांडीवर बसवून त्याला जिवंत जाळण्यासाठी अग्नीमध्ये बसते. तिच्यावर अग्नीचा परिणाम होणार नाही, असे तिला वरदान असते, परंतु भक्त प्रल्हादाच्या विष्णू भक्तीमुळे होलिका स्वतः त्यात जळून खाक होते. भक्त प्रल्हादाला मात्र अग्नीची काहीही बाधा होत नाही. तो सुखरूप राहतो. वाईट प्रवृत्तीचे दहन म्हणून धार्मिकदृष्ट्या होळी हा सण साजरा केला जातो वाईट प्रवृत्तीवर चांगल्या प्रवृत्तीचा विजय म्हणून या सणाकडे पाहिले जाते.

महाराष्टांत होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळली जातात. पेटलेल्या होळीभोवती लोक प्रदक्षिणा घालतात. होळीला म्हणजे अग्नीला नारळ अर्पण करून नवेदय दाखवतात. होळीचा दुसरा दिवस धुळवड किंवा धूलिवंदन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी रंगोत्सव साजरा केला जातो. सर्वांनी एकत्र येऊन एकमेकांना गुलाल लावून, विविध रंगांनी रंगवून रंगांची उधळण केली जाते.वाईट प्रवृत्तीचे दहन करून बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून खूप उत्साहात हा सण संपूर्ण भारत देशात साजरा केला जातो.

**कृती १: खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. गुण २**

१. या उत्सवाला 'होळी पौर्णिमा' 'शिमगा' ---------------------- असे संबोधले जाते.

२. होळी या सणाला थंडीचे दिवस म्हणजे ---------------------- हा ऋतू संपलेला असतो.

३. गावांमध्ये नृत्याचे सादरीकरण हा ---------------------- उत्सवातील अविभाज्य भाग असतो.

४. महाराष्ट्रात होळीच्या दिवशी ---------------------- म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळली जातात.

**कृती २. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **गुण ४**

१. होळीनंतर कोणता ऋतू सुरू होतो ?

२. गावाकडे शिमग्यात कोणकोणती नृत्ये सादर केली जातात ?

३. होळीनिमित्त शेतक-यांमध्ये कोणती प्रथा प्रचलित आहे ?

४. होळीला नारळ अर्पण करण्याची पद्धत कुठे प्रचलित आहे ?

**कृती ३. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **गुण ४**

१. होळी या सणाचे पौराणिक महत्त्व लिहा.

२. महाराष्ट्रात होळी हा सण कसा साजरा केला जातो ?

*** BEST OF LUCK ***

# GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD.

इयत्ता – ९ वी अ,ब,क.  FINAL EXAMINATION  मार्क – ८०

दिनांक : १३ मार्च २०२६  विषय : मराठी  वेळ – २ तास

**INSTRUCTIONS – 1. Section 'B' answers must be written on worksheet Itself.**

**Name: ---------------------------------------- Div: ------------------ Roll No: ---------------**

---

विभाग " ब "  गुण ४०

**प्रश्न १.(अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**  **गुण ४**

**( मोठा, निसर्ग, नीसर्ग, तन, ताण, उमंग, उमग, धारणी, धरणी, सवाल, उत्तर, रेघ, रेघा, काटा, मोटा )**

१. शरीर : ----------------  २. रेषा : ----------------

३. शहारा : ----------------  ४. प्रश्न : ----------------

५. सृष्टी : ----------------  ६. उत्साह : ----------------

७. धरती : ----------------  ८. प्रौढ : ----------------

**प्रश्न १.(ब) खालील शब्दांचे विरुदारथी शब्द लिहा :**  **गुण ४**

**( प्रतीकर्षण, प्रतिकर्षण, कामि, कमी, प्राचीन, अप्रसन्न, प्राचिन, आप्रसंन, मृत, मरुत, निरक्षा, गैरसमज, निरक्षर, गैरसामज, अनियमित, अनीयमीत )**

१. पुष्कळ X ----------------  २. प्रसन्न X ----------------

३. जिवंत X ----------------  ४. नियमित X ----------------

५. आधुनिक X ----------------  ६. आकर्षण X ----------------

७. समज X ----------------  ८. साक्षर X ----------------

**प्रश्न १.(क) खालील शब्दांचे वचन बदलून लिहा :**  **गुण ४**

१. माणूस : ----------------  २. कर्णफूल : ----------------

३. पुस्तक : ----------------  ४.नाटक : ----------------

५. मोरपिस : ----------------  ६. दागिना : ----------------

७. गोगलगाय : ----------------  ८. वर्तुळ : ----------------

**प्रश्न २. (अ). खालील वाक्यातील नाम व प्रकार ओळखा :**  **गुण २**

१. रामाने नदीत मासे पकडले.

उत्तर: नाम : ----------------  प्रकार : ----------------

२. तिच्या आवाजातील माधुर्य सर्वांना आवडले.

उत्तर: नाम : ------------------------------ प्रकार : ------------------------------

**प्रश्न २.(ब) खालील वाक्यातील विशेषण व प्रकार ओळखा.** **गुण २**

१. झाडाखाली दोन मुले खेळत आहेत.

उत्तर: विशेषण : ------------------------------ प्रकार : ------------------------------

२. मला पिवळ्या रंगाची साडी खूप आवडते.

उत्तर: विशेषण : ------------------------------ प्रकार : ------------------------------

**प्रश्न २. (क). खालील वाक्यांचे प्रकार ओळखा :** **गुण २**

१. उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा.

उत्तर: ------------------------------

२. तुम्हाला ही पुस्तके देऊन टाकतो !

उत्तर : ------------------------------

**प्रश्न २. (ड). खालील वाक्यातील काळ ओळखा:** **गुण २**

१. वारा झाड हलवत आहे.

उत्तर: ------------------------------

२. शिक्षक धडा शिकविणार.

उत्तर: ------------------------------

**प्रश्न ३. (अ) खालील विरामचिन्ह ओळखून त्यांच्या जोड्या जुळवा.** **गुण २**

| अ. क्र | "अ" गट | उत्तरे | "ब" |
|---|---|---|---|
| १. | (" ") | | अपूर्णविराम |
| २. | ( . ) | | संयोग चिन्ह |
| ३. | ( : ) | | दुहेरी अवतरण चिन्ह |
| ४. | ( - ) | | पूर्णविराम |

**प्रश्न ३. (ब) अचूक शब्द ओळखा :** **गुण २**

१. स्मृति / स्मृती / समृती : ------------------------------

२. अलिप्त / अलिप्ता / अलिपत : ------------------------------

**प्रश्न ३. (क). खालील दिलेल्या शब्दापासून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.** **गुण २**

१. साळसूद ( INNOCENT ) : ----------------------------------------

२. व्यायाम ( EXERCISE ) : ----------------------------------------

**प्रश्न ४.(अ). रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण ३**

१. हा -------------------- खेळ मला फार आवडला.
(पायांचा, बोटांचा, हाताचा )

२. भारतात सर्वात पहिली रेल्वे -------------------- येथून सुटली.
( ठाणे / मुंबई / कर्जत / पुणे )

३. व्हेनिस म्हणजे अफाट -------------------- !
( वायुदर्शन / हवादर्शन / जलदर्शन )

**प्रश्न ४.(ब). खालील दिलेल्या शब्दांचे अर्थ लिहा :** **गुण ४**

**( निर्मळ आनंद, साखळी, अंतर्मन, आजारी, विशाल, अचानक, कुटुंब, बलवान )**

१. आत्मा :--------------------   २. एकाएकी :--------------------

३. विस्तीर्ण :--------------------   ४. माळका :--------------------

५. बिऱ्हाड :--------------------   ६. सशक्त :--------------------

७. बालसुलभ आनंद :--------------------   ८. विकारी :--------------------

**प्रश्न ४. (क). वाक्प्रचार व अर्थ लिहा :** **गुण ७**

**( पाठिंबा असणे, निराश होणे, उत्सुक होणे, खूप प्रयत्न करणे, इशारा करणे, मानसिक दबाव असणे, निघून जाणे )**

१. आतुर होणे :--------------------

२. पाठबळ असणे :--------------------

३. खाणाखुणा करणे :--------------------

४. ताण असणे :--------------------

५. हिरमोड होणे :--------------------

६. रवाना होणे :--------------------

७. आटापिटा करणे :--------------------

***** BEST OF LUCK *****